दिनेश
बिल्डींग मटेरियल सप्लायर्स
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368, 9860330587

दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे




वर्ष ५ । अंक २४२ । मंगळवार २३ जून २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

# सर्जेपुऱ्यातील घरफोडीचा तोफखाना पोलिसांकडून छडा

**दोन आरोपींना अटक । १ लाख ९० हजारांचा मुद्देमाल जप्त**



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–**घराच्या गॅलरीचा दरवाजा उघडा असल्याचा गैरफायदा घेत झालेल्या घरफोडीचा छडा लावण्यात तोफखाना पोलिसांना यश आले आहे. या कारवाईत पोलिसांनी विधीसंघर्षीत बालकासह दोन जणांना ताब्यात घेतले असून, त्यांच्याकडून १,९०,०००/- रुपये किमतीचा १३ ग्रॅम सोन्याचा मुद्देमाल जप्त केला आहे. दुर्गेश चंद्रकांत चिंतामणी (वय २२ वर्षे, रा. दाळमंडई),प्रकाश रावसाहेब उमाप (वय २८ वर्षे, रा. सिद्धार्थनगर, बालिकाश्रम रोड) अशी अटक आरोपींची नावे आहेत.

सर्जेपुरा येथील मिसाळ गल्लीत राहणाऱ्या सौ. स्वाती विशाल घुगरे या ३१ मे रोजी उन्हाळ्याचे दिवस असल्याने गॅलरीचा दरवाजा उघडा ठेवून कुटुंबासह झोपल्या होत्या. पहाटे अज्ञात चोरांनी घरात प्रवेश करून बेडरुममधील कपाटातून सोन्याचे गंठण आणि टॉप्स चोरून नेले होते. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. ■ पान ४ वर

**पथकात यांचा सहभाग**

या कारवाईत पोलीस अधीक्षक म्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिलीप टिपरसे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक बालाजी वैद्य, उपनिरीक्षक योगेश चाहेर, नितीन उगलमुगले, अरुण गांगुर्डे आदींचा सहभाग होता. पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल गणेश साठे करत आहेत.

# शहरातील एकही बालक पोलिओ डोसपासून वंचित राहणार नाही – महापौर

**राष्ट्रीय पल्स पोलिओ डोस मोहीम २८ जून रोजी; अहिल्यानगर महानगरपालिकेची तयारी पूर्ण । जनजागृती पोस्टरचे प्रकाशन**



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** राष्ट्रीय पल्स पोलिओ निर्मूलन मोहिमेअंतर्गत रविवार, दिनांक २८ जून २०२६ रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ५ या वेळेत शून्य ते पाच वर्षे वयोगटातील सर्व बालकांना पल्स पोलिओचा डोस देण्यात येणार असून या मोहिमेसाठी अहिल्यानगर महानगरपालिकेची सर्व तयारी पूर्ण झाली आहे. महापौर ज्योतीताई गाडे यांनी विशेष बैठक घेऊन मोहिमेच्या पूर्वतयारीचा आढावा घेत विविध सूचना दिल्या.

यावेळी महापौर ज्योतीताई गाडे म्हणाल्या की, शहरातील एकही बालक पल्स पोलिओ डोसपासून वंचित राहणार नाही यासाठी प्रशासनामार्फत व्यापक नियोजन करण्यात आले आहे. शेवटच्या घटकातील बालकापर्यंत पोहोचण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून शहरातील प्रत्येक कुटुंबापर्यंत ही मोहीम प्रभावीपणे पोहोचविण्यात येणार आहे. शहरामध्ये महानगरपालिकेची सात आरोग्य केंद्रे तसेच २२५ पोलिओ बूथवर एकाच वेळी बालकांना पल्स पोलिओचा डोस देण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

या बैठकीस महानगरपालिका महिला व बालकल्याण समिती सभापती दिपालीताई बारस्कर, उपायुक्त मेहेर लहारे, मनपा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर, नगरसेवक करण कराळे, डॉ. वृषाली आरु, सुनील कटारिया, राजेश परदेशी, अमर गुरप, सतीश ठोंबे, आयेशा शेख, डॉ. गिरीश दळवी, योगेश औटी आदी उपस्थित होते.

महापौर ज्योतीताई गाडे पुढे म्हणाल्या की, शहरातील सर्व पालकांनी आपल्या शून्य ते पाच वर्षे वयोगटातील पाल्यांना रविवार, दिनांक २८ जून रोजी जवळच्या पोलिओ केंद्रावर घेऊन जाऊन पल्स पोलिओचा डोस देणे आवश्यक आहे. पोलिओमुक्त भारताच्या राष्ट्रीय अभियानात प्रत्येक पालकाने सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी मनपा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर म्हणाले की, राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहीम ही बालकांच्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची मोहीम आहे. ■ पान ४ वर

# जिल्ह्यातील आठ जुगार अड्ड्यांवर छापे

**एलसीबीच्या कारवाईत सव्वा लाखांपेक्षा जास्त मुद्देमाल जप्त**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** स्थानिक गुन्हे शाखेने एकाच दिवशी श्रीरामपूर, कोतवाली आणि तोफखाना पोलीस ठाण्याच्या हद्दीत एकूण ८ जुगार अड्ड्यांवर छापे टाकून तब्बल १ लाख ६५ हजार २६० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी संबंधित पोलीस ठाण्यांमध्ये ८ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी जिल्ह्यातील अवैध व्यावसायिकांवर कडक कारवाई करण्याचे आदेश स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांना दिले होते. या आदेशानुसार पोनि मुटकुळे यांनी तात्काळ कारवाईसाठी ■ पान ४ वर



# सायबर गुन्ह्यांवर सभागृहात आमदार दाते सरांचा घणाघात

**मुख्यमंत्री फडणवीसांनी दिली आकडेवारीसह माहिती**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पारनेर–** राज्यात वाढत्या सायबर गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर पारनेरचे आमदार काशिनाथ दाते सर यांनी विधानसभेत उपस्थित केलेल्या लक्षवेधी प्रश्नामुळे सायबर फसवणुकीच्या वाढत्या घटनांकडे शासनाचे लक्ष वेधले गेले आहे. या प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यभरातील सायबर गुन्ह्यांची माहिती देत कठोर कारवाई सुरू असल्याचे स्पष्ट केले.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी सभागृहात सांगितले की, जानेवारी २०२५ ते मे २०२६ या कालावधीत राज्यात सायबर आर्थिक फसवणुकीचे १० हजार ५०५ गुन्हे नोंदविण्यात आले असून २ हजार ३७९ आरोपींना अटक करण्यात आली आहे. नागरिकांची आर्थिक फसवणूक रोखण्यासाठी विशेष यंत्रणा कार्यरत असल्याचे त्यांनी नमूद केले.




आमदार काशिनाथ दाते यांनी अहिल्यानगर जिल्ह्यातील वाढत्या सायबर गुन्ह्यांचा मुद्दा उपस्थित करत नागरिकांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक झाल्याचे प्रकरण सभागृहात मांडले होते. त्यावर उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, अहिल्यानगर जिल्ह्यात २०२५ मध्ये सायबर फसवणुकीच्या ५ हजार १४१ तक्रारी प्राप्त झाल्या असून त्यामध्ये सुमारे ३७.७६ कोटी रुपयांची फसवणूक झाल्याचे निदर्शनास आले आहे. यातील ७.०२ कोटी रुपयांची रक्कम होल्ड करण्यात आली असल्याची माहितीही त्यांनी दिली.

कोपरगाव येथील निवृत्त शासकीय कर्मचाऱ्याची डिजिटल अटकेची भीती दाखवून करण्यात आलेल्या फसवणुकीच्या प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीविरुद्ध दोषारोपपत्र न्यायालयात सादर करण्यात आले आहे. तसेच फसवणुकीतील मोठी रक्कम गोठवून त्यातील काही रक्कम फिर्यादीस परत देण्यात आल्याची माहितीही मुख्यमंत्र्यांनी दिली.

राज्यातील सायबर गुन्ह्यांवर नियंत्रण मिळवण्यासाठी शासनाने महाराष्ट्र सायबर सुरक्षा प्रकल्प अधिक सक्षम केला असून राज्यातील ५० जिल्हा सायबर लॅब आणि विशेष पोलीस ठाण्यांच्या माध्यमातून तपास यंत्रणा बळकट करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी सायबर हेल्पलाईन १९३०, सोशल मीडियावरील मोहिमा, रेल्वे स्थानकांवरील डिजिटल स्क्रीन आणि विविध माध्यमांतून ■ पान ४ वर

# महानगरपालिकेत महावितरण व पाणीपुरवठा विभागासमवेत नगरसेवकांची तातडीची बैठक

**येत्या आठ दिवसांत शहराचा पाणीपुरवठा सुरळीत करा; अन्यथा अधिकाऱ्यांना काळे फासू; नगरसेवकांचा इशारा**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** शहरातील विस्कळीत झालेल्या पाणीपुरवठ्याच्या गंभीर प्रश्नाच्या पार्श्वभूमीवर पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि आमदार संग्राम जगताप यांनी तातडीने दखल घेत महापालिकेतील आयुक्तांच्या दालनात महावितरण कार्यालय, पाणीपुरवठा विभाग आणि नगरसेवकांची संयुक्त बैठक आयोजित करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे यांच्या दालनात ही बैठक संपन्न झाली. बैठकीत नगरसेवकांनी महावितरण विभागाच्या अधिकाऱ्यांना धारेवर धरत शहरातील वीजपुरवठा आणि पाणीपुरवठ्याच्या समस्यांबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली.



यावेळी नगरसेवकांनी स्पष्ट शब्दांत इशारा देत सांगितले की, येत्या आठ दिवसांत वीज वितरण व्यवस्था सुरळीत करून शहराचा पाणीपुरवठा नियमित करावा, अन्यथा महावितरण विभागाच्या अधिकाऱ्यांना काळे फासण्याचा आंदोलनात्मक मार्ग अवलंबावा लागेल.

या बैठकीस राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, माजी महापौर बाबासाहेब वाकळे, माजी उपमहापौर गणेश भोसले, स्थायी समितीचे माजी सभापती अविनाश घुले, ■ पान ४ वर

# एलसीबीचे पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र वाघ तडकाफडकी निलंबित

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** हप्तेखोरीच्या प्रकरणात सहभाग असल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाल्याने स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र देवमन वाघ यांना पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी तडकाफडकी निलंबित केले आहे. रेशनिंगच्या काळाबाजाराशी संबंधित प्रकरणात नेवासा पोलीस ठाण्यात दाखल गुन्ह्यात हप्तेखोरी निष्पन्न झाल्याने तात्काळ प्रभावाने ही कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईने नगर पोलीस दलात खळबळ उडाली आहे.

वाघ हे एलसीबीमध्ये पोलीस निरीक्षक म्हणून कार्यरत असून, एलसीबीकडून जिल्हास्तरावर अवैध धंद्यांवर कारवाया करण्यात येतात. नेवासा पोलीस ठाण्यात रेशनिंगच्या धान्याच्या काळाबाजार प्रकरणी दाखल असलेल्या एका गुन्ह्यात वाघ यांनी आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करून दोघांची नावे गोवल्याचे समोर आले आहे. आधी संबंधितांकडे हप्त्याची मागणी केली व हप्ता न दिल्याने संबंधितांवर खोटा गुन्हा दाखल केल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे. त्यामुळे वाघ यांना तडकाफडकी निलंबित करण्यात आले असून, त्यांची विभागीय चौकशी सुरू करण्यात आली आहे.

**मागील वर्षी राष्ट्रपती पदकाने गौरव,**
**यावर्षी निलंबन अन विभागीय चौकशी...**

निलंबित पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र वाघ यांचा गेल्या वर्षी २०२५ मध्ये राष्ट्रपती पोलीस पदक देऊन गौरव करण्यात आला होता. हप्तेखोरीमुळे त्यांची आता विभागीय चौकशी करण्यात येणार आहे. मागील वर्षी राष्ट्रपती पदक व यावर्षी निलंबन व विभागीय चौकशी असा प्रकार या पोलीस अधिकाऱ्याच्या बाबतीत घडल्याने पोलीस दलात खळबळ उडाली आहे.

# शेतकरी प्रश्नांवर सरकारने तातडीने निर्णय घ्यावा

**खा. नीलेश लंके यांची मागणी । सरसकट कर्जमाफी, शेतमालाला हमीभाव व अतिवृष्टी भरपाईसाठी पारनेरमध्ये विविध पक्ष–संघटनांचा जनआक्रोश मोर्चा**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पारनेर–** शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी, शेतमालाला हमीभाव, अतिवृष्टीग्रस्तांना तातडीने मदत, पीकविमा योजनांची प्रभावी अंमलबजावणी तसेच शेतीसंबंधित विविध प्रलंबित प्रश्नांवर सरकारने तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी खासदार नीलेश लंके यांनी केली.

या मागण्यांसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार), शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे), अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, भूमिपुत्र शेतकरी संघटना, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, शिवबा संघटना, संभाजी ब्रिगेड आणि भ्रष्टाचार विरोधी जनआंदोलन यांच्या संयुक्त विद्यमाने पारनेर तहसील कार्यालयावर जनआक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.

खा. नीलेश लंके यांच्या संपर्क कार्यालयापासून मोर्चास सुरुवात झाली. तालुक्यातील विविध गावांमधून आलेले शेतकरी, कार्यकर्ते आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने या मोर्चात सहभागी झाले होते. बैलगाड्या, ट्रॅक्टर तसेच शेळ्या-मेंढ्यांसह अनेक शेतकऱ्यांनी सहभाग नोंदवत शासनाचे लक्ष वेधून घेतले. शेतकरी हिताच्या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला.






मोर्चा तहसील कार्यालयावर पोहोचल्यानंतर आयोजित सभेत खा. लंके यांनी शेतकऱ्यांसमोरील गंभीर परिस्थितीवर भाष्य केले. वाढता उत्पादन खर्च, शेतीमालाला मिळत असलेले अपुरे दर, नैसर्गिक आपत्तींचे संकट, कर्जबाजारीपणा आणि बाजारातील अस्थिरता यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला असल्याचे त्यांनी सांगितले. निवडणुकीपूर्वी शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी व सातबारा कोरा करण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र त्याची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

कांदा, सोयाबीन, कापूस, दूध आणि इतर कृषी उत्पादनांना उत्पादन खर्चावर ■ पान ४ वर

## दै. आकर्षण निवडक

### अहिल्यानगरच्या वेदांत नितीन मंत्री सीए फायनरमध्ये देशात २६ वा क्रमांक



अहिल्यानगर - इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडियातर्फे () घेण्यात आलेल्या मे २०२६ च्या परीक्षेचा निकाल आज जाहीर झाला. या परीक्षेत अहिल्यानगरच्या वेदांत नितीन मंत्री याने देशपातळीवर २६ वा क्रमांक पटकावून शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. विशेष म्हणजे, वेदांत ने हे यश पहिल्याच प्रयत्नात मिळवले आहे. सारखी अत्यंत कठीण मानली जाणारी परीक्षा पहिल्या प्रयत्नात उत्तीर्ण होणे हेच मोठे आव्हान असते. त्यात देशभरातील लाखो विद्यार्थ्यांमधून ३० मध्ये स्थान मिळवणे ही असामान्य कामगिरी आहे.त्याचप्रमाणे अमेरिकेच्या परीक्षेच्या दोन लेवल त्याने पहिल्याच प्रयत्नात पास केलेल्या आहेत. त्याने यापूर्वीच्या सीए इंटरमिजिएट च्या परीक्षेत भारतात बारावा क्रमांक मिळविला होता.सीए फाउंडेशन परीक्षेत नगर शहरात दुसरा क्रमांक मिळविला होता. चि. वेदांत याने सी.ए.फाऊंडेशन, सी.ए. इंटरमिजिएट व सी.ए. फायनल तिन्ही कोर्सचे ऑनलाईन लेक्चर घरी बसून पूर्ण केले. स्वतःची जिद्द व अथक परिश्रमाने त्याने हे यश मिळवत नगरचे नाव देशपातळीवर पोहचविले. तो व्यापारी श्री रामनारायण मंत्री आणि एडीसीसी बँकेचे निवृत्त एमडी श्री आर.डी.मंत्री यांचा नातू तर व्यापारी नितीन व सौ. कविता मंत्री यांचा मुलगा आहे. चि. वेदांत याचे शालेय शिक्षण सेंट मायकेल स्कूलमध्ये तर बारावी श्रीरामकृष्ण एज्युकेशन कॉलेजमध्ये पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण झाला होता. बीकॉम सारडा कॉलेजमधून उत्तीर्ण झालेला होता.

### डॉ.पाऊलबुधे तंत्रनिकेतन कॉलेजचा १०० टक्के निकाल

अहिल्यानगर- नारायणडोह येथील डॉ. पाऊलबुधे तंत्रनिकेतन महाविद्यालयाचा निकाल १०० टक्के लागला असून उत्कृष्ट निकालाची परंपरा यंदाही कायम ठेवली आहे. महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळातर्फे उन्हाळी पदविका परीक्षाचा निकाल जाहीर झाला आहे.डॉ. पाऊल बुधे तंत्रनिकेतनने समृद्ध भारतासाठी नवीन तरुण अभियंते घडवित आहेत.अशी प्रतिक्रिया प्राचार्य बाळासाहेब बोर्डे यांनी व्यक्त केली. महाविद्यालयाने यंदाही १०० टक्के निकालाची परंपरा कायम ठेवल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष विनय पाऊलबुधे, संचालक साई पाऊलबुधे,पदाधिकारी यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे. अंतिम वर्ष मेकॅनिकल अभियांत्रिकी विभागात रेहान शेख ८२% प्रथम श्रेयश कल्याणम ८१% द्वितीय तर श्रेयस जाधव ७९ % गुण मिळवून तृतीय आला आहे. अंतिम वर्ष विद्युत अभियांत्रिकी विभागात प्रज्योत धांगडे ८३% प्रथम, तुषारी वाघ ८२ % द्वितीय, तर पवन वाघ ८० % गुण मिळवून तृतीय आला आहे. सिव्हिल अभियांत्रिकी विभागात विश्वजीत पवार ८५ % प्रथम,सुप्रिया भाबड ७४% टक्के द्वितीय, विजय खळदकर ६६% तृतीय असे यश मिळवले आहे. संगणक अभियांत्रिकी विभागात चार विद्यार्थी प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले. या सर्वांना ९१% गुण मिळाले आहेत. यामध्ये नीलम सय्यद, दिव्या अंकम, कृष्णा रंगाटे, आदित्य राऊत या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे. द्वितीय, प्रथम अशा सर्व विभागातील विद्यार्थी चांगले गुणांनी उत्तीर्ण झाले आहेत. तर कृत्रिम बुद्धिमत्ता () विभागात देखील विद्यार्थ्यांनी चांगली कामगिरी केली आहे.या सर्व विद्यार्थ्यांचे प्राचार्य बाळासाहेब बोर्डे, उपप्राचार्य राजेंद्र देशपांडे, प्राध्यापक,शिक्षक वृंद आदींनी अभिनंदन केले आहे.

### प्रियांक खर्गे यांना २६ जूनला 'न्यायमूर्ती रामशास्त्री प्रभुणे' राष्ट्रीय मानवंदना

अहिल्यानगर - राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या नोंदणी, कायदेशीर अस्तित्व, आर्थिक व्यवहार, निधीचे स्रोत, खर्चाचे तपशील आणि लेखापरीक्षण अहवाल सार्वजनिकपणे जाहीर करण्याची मागणी करणारे कर्नाटकचे गृहमंत्री प्रियांक खर्गे यांच्या भूमिकेचे स्वागत करत पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसदेच्या वतीने त्यांना 'न्यायमूर्ती रामशास्त्री प्रभुणे' राष्ट्रीय मानवंदना अर्पण करण्याचा ठराव करण्यात आला आहे.

# योग ही जीवनदायी गरज – उद्योजक शेळके

**भाग्योदय विद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** भाग्योदय माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहपूर्ण व शिस्तबद्ध वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांसह शिक्षकवृंद, योगप्रेमी नागरिक आणि मान्यवरांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला. योगाचे महत्त्व, त्याचे आरोग्यदायी फायदे आणि विद्यार्थ्यांच्या जीवनातील उपयुक्तता याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य ज्ञानदेव बेरड होते, तर उद्योजक राजेंद्र शेळके हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. याशिवाय योगशिक्षक डॉ. गोविंद कदम, प्रा. एकनाथ होले यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना उद्योजक राजेंद्र शेळके म्हणाले की, योग ही आजच्या काळातील जीवनदायी गरज असून शरीर, मन आणि आत्मा यांचा समतोल राखण्यासाठी योग अत्यंत महत्त्वाचा आहे. नियमित योगाभ्यासामुळे विद्यार्थ्यांची एकाग्रता वाढते, स्मरणशक्ती सुधारते तसेच मानसिक विकासाला चालना मिळते. किरकोळ आजारांपासून संरक्षण मिळवण्यासाठी आणि शरीर सुदृढ ठेवण्यासाठी योगाचा दैनंदिन जीवनात समावेश करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

प्राचार्य ज्ञानदेव बेरड यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सांगितले की, योगामुळे विद्यार्थ्यांचा शारीरिक, मानसिक आणि भावनिक विकास होतो. नियमित योगाभ्यासामुळे प्रतिकारशक्ती वाढते तसेच अध्ययन क्षमतेतही लक्षणीय सुधारणा होते. विद्यार्थ्यांनी योगाला आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनवावे आणि सूर्योदयापूर्वी योगाभ्यास करण्याची सवय लावावी, असे आवाहन त्यांनी केले. महर्षी पतंजली यांच्या अष्टांग योगाच्या तत्त्वांचा अंगीकार केल्यास निरोगी व संतुलित जीवन जगता येते, असेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक योग शिक्षक डॉ. गोविंद कदम यांनी केले. त्यांनी पतंजलींच्या अष्टांग योगाचे महत्त्व विशद करताना समाजात वाढत चाललेली अस्वस्थता, चिडचिड आणि तणाव यावर योग हे प्रभावी उत्तर असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांच्या बुद्धिमत्ता विकासासाठी प्राणायाम आणि ध्यानाचे नियमित प्रशिक्षण आवश्यक असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले. तसेच विविध योगासनांसह हास्यासन, सिंहासन, शवासन आणि प्राणायामाच्या प्रकारांची माहिती उपस्थितांना दिली.

यानंतर प्रा. एकनाथ होले यांनी विद्यार्थ्यांसमोर विविध योगासनांची प्रात्यक्षिके सादर केली. विद्यार्थ्यांनीही उत्साहाने सहभाग घेत शिस्तबद्ध पद्धतीने योगासने सादर केली. कार्यक्रमास रेणुकामाता विद्यालयाचे मुख्याध्यापक बन्सी नरवडे, बाबासाहेब कोतकर, सोपान तोडमल, धनंजय बारगळ, शिवाजी धस, आदिनाथ ठुबे, संतोष काकडे, रूपाली शिंदे, संगीता मेढे, पद्मजा केरुलकर, सुनीता कोरडे, कनिष्ठ विद्यालयातील गोरक्ष कांडेकर, दत्तात्रय पांडुळे, गणेश गायकवाड, वैष्णवी जगताप, बाळासाहेब कावरे, सुधाकर गायकवाड आदी उपस्थित होते.

# १ हजार ५२२ अग्निवीरांचा भव्य शपथविधी-परेड सोहळा उत्साहात

**राष्ट्रसेवेसाठी सज्ज झालेल्या अग्निवीरांनी घेतली निष्ठेची शपथ**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** मेकॅनाइज्ड इन्फंट्री सेंटर अँड स्कूल (एमआयसी अँड एस), अहिल्यानगर येथे १ हजार ५२२ अग्निवीरांचा भव्य शपथविधी-परेड सोहळा संपूर्ण लष्करी दिमाखात संपन्न झाला. २४ आठवड्यांचे कठोर आणि सर्वसमावेशक लष्करी प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर या अग्निवीरांनी राष्ट्रसेवेसाठी स्वतःला समर्पित करण्याची शपथ घेतली. या सोहळ्याने नव्याने भरती झालेल्या तरुणांचे शिस्तबद्ध, कर्तव्यदक्ष आणि राष्ट्रनिष्ठ सैनिकांमध्ये झालेले यशस्वी रूपांतर अधोरेखित केले.

या दिमाखदार समारंभात अग्निवीरांनी भारतीय सैन्य तसेच मेकॅनाइज्ड इन्फंट्री रेजिमेंटच्या गौरवशाली परंपरा, मूल्ये आणि शौर्याचा वारसा जपण्याची शपथ घेतली. उत्कृष्ट ड्रिल, लष्करी अचूकता आणि शिस्तबद्ध संचलनामुळे संपूर्ण परिसर देशभक्तीच्या भावनेने भारावून गेला.

या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले ब्रिगेडियर पी. सुनील कुमार यांनी परेडची सलामी स्वीकारली. त्यांनी प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केल्याबद्दल सर्व अग्निवीरांचे अभिनंदन करताना त्यांच्या समर्पण, चिकाटी आणि उच्च शिस्तीचे कौतुक केले. भारतीय सैन्याच्या आदर्शांचा सन्मान राखत कर्तव्यनिष्ठेने राष्ट्रसेवा करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

समारंभाला अग्निवीरांचे पालक आणि कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या पाठिंब्याने, त्यागाने आणि प्रोत्साहनाने या तरुण सैनिकांच्या व्यक्तिमत्त्व विकासात महत्त्वाची भूमिका बजावली असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. राष्ट्राच्या भावी रक्षकांचे संगोपन केल्याबद्दल पालकांचा विशेष गौरव करण्यात आला तसेच त्यांना गौरवपदक प्रदान करून सन्मानित करण्यात आले. शपथविधी-परेड हा प्रत्येक अग्निवीराच्या जीवनातील एक महत्त्वपूर्ण टप्पा असून या सोहळ्यानंतर ते भारतीय सैन्याच्या विविध युनिट्समध्ये राष्ट्रसेवेसाठी कार्यरत होणार आहेत. या समारंभातून भारतीय सैन्य आणि मेकॅनाइज्ड इन्फंट्री सेंटर अँड स्कूल यांची राष्ट्राची सार्वभौमता आणि अखंडता जपण्यासाठी सक्षम, प्रेरित, शिस्तबद्ध आणि युद्धसज्ज सैनिक घडविण्याची दृढ बांधिलकी पुन्हा अधोरेखित झाली.

# शिक्षणमहर्षी कै. गुरुवर्य बत्तिन यांची १३८ वी जयंती उत्साहात साजरी

**पद्मशाली समाजाच्या उन्नतीसाठी गुरुवर्य बत्तिन यांचे योगदान प्रेरणादायी – नारायण मंगलारम**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पद्मशाली समाजात शिक्षणाची ज्योत प्रज्वलित करून सामाजिक जागृतीची चळवळ उभारणारे पद्मशाली विद्या प्रसारक मंडळाचे संस्थापक कै. गुरुवर्य बत्तिन यांची १३८ वी जयंती शहरातील गांधी मैदान परिसरातील प्रा. बत्तिन पोट्यन्ना प्राथमिक विद्यालयात उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. यानिमित्त आयोजित अभिवादन सोहळ्यात त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून उपस्थितांनी कृतज्ञतापूर्वक अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी कै. गुरुवर्य बत्तिन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक आणि संघटनात्मक कार्याचा आढावा घेत उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या कार्याला उजाळा दिला. समाजातील वंचित घटकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांची आठवण यावेळी करण्यात आली.

या अभिवादन सोहळ्यास गुरुवर्य पोट्यन्ना बत्तीन शैक्षणिक सामाजिक प्रतिष्ठानचे नूतन अध्यक्ष नारायण मंगलारम, उपाध्यक्ष सदाशिव बत्तीन, कार्याध्यक्ष ज्ञानेश्वर मंगलारम, मावळते अध्यक्ष बाळकृष्ण सिद्धम, मावळते सचिव बाळकृष्ण गोटीपामुल, प्रा. वीरभद्र बत्तीन, सामाजिक कार्यकर्ते शिवाजीराव संदुपटला, मुख्याध्यापक श्रीनिवास मुत्त्याल, रावसाहेब इंगळे, शोभा बडगू, अनंता गाली, आरती नक्का यांच्यासह शिक्षक, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना नारायण मंगलारम यांनी कै. गुरुवर्य बत्तिन यांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, शिक्षण हेच समाजपरिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन आहे, हा संदेश त्यांनी आपल्या कार्यातून दिला. पद्मशाली समाजाला संघटित करून शिक्षणाची गोडी निर्माण करण्याचे मोठे कार्य त्यांनी केले. आजच्या स्पर्धात्मक युगात युवक-युवतींनी उच्च शिक्षण घेऊन विविध क्षेत्रांत प्रगती साधणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल, असे त्यांनी नमूद केले.

उपाध्यक्ष सदाशिव बत्तीन यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, कै. गुरुवर्य बत्तिन यांचे विचार आणि कार्य आजही समाजाला प्रेरणा देणारे आहे. समाजसेवेचे व्रत स्वीकारून त्यांनी शिक्षणाच्या माध्यमातून अनेक कुटुंबांच्या जीवनात परिवर्तन घडवून आणले. त्यांच्या प्रयत्नांमुळे शहरात आणि परिसरात पद्मशाली समाजाची शैक्षणिक व सामाजिक वाटचाल अधिक सक्षम झाली. त्यांच्या कार्याचा आदर्श नव्या पिढीने घेण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

या प्रसंगी सदाशिव बत्तीन यांनी विद्यालयाच्या ग्रंथालयासाठी पुस्तके उपलब्ध करून देण्याची घोषणा केली. तर नारायण मंगलारम यांनी विद्यालयाच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक ते सर्व सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी कै. गुरुवर्य बत्तिन यांच्या जीवनकार्यावर आधारित भाषणे, मनोगते आणि विचार सादर केले. त्यांच्या जीवनातील संघर्ष, समाजासाठी केलेले कार्य आणि शिक्षण क्षेत्रातील योगदान यावर विद्यार्थ्यांनी प्रभावीपणे प्रकाश टाकला.

कै. गुरुवर्य बत्तिन यांनी शिक्षणाच्या माध्यमातून समाजाला स्वाभिमान, प्रगती आणि संघटनशक्तीची दिशा दिली. त्यांनी रुजविलेल्या शैक्षणिक मूल्यांमुळे अनेक विद्यार्थी घडले असून आज विविध क्षेत्रांत यशस्वीपणे कार्यरत आहेत. त्यांच्या कार्यामुळे समाजात शिक्षणाविषयी सकारात्मक दृष्टीकोन निर्माण झाला, याची आठवण उपस्थितांनी यावेळी करून दिली. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमासाठी विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# केडगावच्या सरस्वती विद्यामंदिरात एआय तंत्रज्ञानाची नवी भरारी



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** केडगाव येथील डॉक्टर हेडगेवार शिक्षण प्रतिष्ठान संचलित सरस्वती प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्या मंदिर येथे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी नवनीत एआय सिस्टीम उपलब्ध करून देण्यात आले. या अत्याधुनिक एआय प्रणालीचे उद्घाटन नगर केंद्राचे अध्यक्ष दादाराम ढवाण यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले.

यावेळी संस्थेचे कार्यवाह सोमनाथजी दिघे,संस्थेचे सहकार्यवाह डॉ. रवींद्र चोभे, शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य दादासाहेब काजळे, शाळेचे मुख्याध्यापक संदीप भोर तसेच सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते.

नवीन सक्षम इंटरॅक्टिव्ह पॅनलच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना दृकश्राव्य पद्धतीने अध्यापन, शैक्षणिक व्हिडिओ, थेट प्रात्यक्षिके, ऑनलाइन अध्ययन साहित्य तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित विविध शैक्षणिक साधनांचा लाभ मिळणार आहे. यामुळे विद्यार्थ्यांची आकलन क्षमता, सहभाग आणि अभ्यासातील रुची वाढण्यास मोठी मदत होणार आहे.

यावेळी मनोगत व्यक्त करताना दादाराम ढवाण म्हणाले की, आजच्या आधुनिक युगात शिक्षण क्षेत्रात तंत्रज्ञानाचा वापर अत्यंत गरजेचा आहे. इंग्रजी माध्यमाच्या शाळांच्या बरोबरीने मराठी माध्यमाच्या शाळांनीही आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करून पुढे जाणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना काळानुरूप शिक्षण मिळावे आणि त्यांना जागतिक स्पर्धेसाठी सक्षम बनवावे, या उद्देशाने सरस्वती विद्यामंदिरमध्ये एआय तंत्रज्ञानाची सुरुवात करण्यात आली आहे.

# योग ही शरीर, मन आणि आत्म्याचा समतोल साधणारी जीवनपद्धती - ॲड.गायत्री गुंड

**शिवगामिनी फाउंडेशन व वासुदेव कुटुंबकम योग सेंटरतर्फे आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा**




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त शहरातील शिवगामिनी मल्टिपर्पज फाउंडेशन आणि 'वासुदेव कुटुंबकम योग ॲण्ड फिटनेस सेंटर' यांच्या संयुक्त विद्यमाने भिस्तबाग महाल, तपोवन रोड येथे उत्साहपूर्ण वातावरणात योग शिबिर घेण्यात आले. योगाचे महत्त्व जनसामान्यांपर्यंत पोहोचविणे आणि युवक-युवतींसह सर्व नागरिकांना निरोगी जीवनशैलीचा संदेश देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

कार्यक्रमात विविध योगासने, प्राणायाम, ध्यानधारणा आणि आरोग्यविषयक मार्गदर्शनाच्या माध्यमातून उपस्थितांना योगाचे महत्त्व पटवून देण्यात आले. युवक-युवती, महिला, पालक आणि योगप्रेमी नागरिकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेत योगाभ्यासाचा अनुभव घेतला. योगामुळे शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच मानसिक शांतता आणि सकारात्मक ऊर्जा प्राप्त होते, याची जाणीव उपस्थितांना करून देण्यात आली.

यावेळी योग क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे उत्कृष्ट योगगुरु विशाल ठोकळ यांचा विशेष सन्मान करण्यात आला. तसेच उत्कृष्ट योगी म्हणून राजेश्री पोहेकर, अरुषी खिलवाणी आणि सौरभ जैन यांचा शिवगामिनी मल्टिपर्पज फाउंडेशनच्या अध्यक्षा ॲड. गायत्री गुंड पाटील यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. योग क्षेत्रातील योगदानाचा गौरव म्हणून हा सन्मान करण्यात आला होता.

ॲड. गायत्री गुंड पाटील म्हणाल्या की, ''योग हा केवळ व्यायामाचा प्रकार नसून शरीर, मन आणि आत्म्याचा समतोल साधणारी एक परिपूर्ण जीवनपद्धती आहे. आधुनिक जीवनशैलीमुळे वाढत चाललेला ताणतणाव, विविध आजार आणि मानसिक अस्वस्थता दूर करण्यासाठी योग अत्यंत प्रभावी ठरतो. नियमित योगाभ्यासामुळे निरोगी, आनंदी आणि दीर्घायुष्य लाभते. त्यामुळे प्रत्येकाने योगाला आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनविण्याची गरज आहे.''

# केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या ७ जुलैच्या शेवगाव दौऱ्याच्या तयारीला वेग

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाच्या जिल्हा पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक शनिवारी (दि. २० जून) शहरातील शासकीय विश्रामगृह येथे पार पडली. पक्षाचे जिल्हाध्यक्ष सुनिल साळवे यांच्या प्रमुख उपस्थितीत ज्येष्ठ नेते अशोक गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत संघटनात्मक बांधणी, आगामी कार्यक्रमांचे नियोजन आणि कार्यकर्त्यांच्या जबाबदाऱ्यांसह सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीत पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या ७ जुलै रोजी होणाऱ्या शेवगाव दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर व्यापक नियोजन करण्यात आले. यावेळी शेवगाव येथे आयोजित करण्यात येणाऱ्या दक्षिण जिल्हा संकल्प मेळाव्याबरोबरच भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याच्या भूमिपूजन सोहळ्याची तयारी, उपस्थिती वाढविण्यासाठी आखण्यात येणारी रणनीती आणि जनसंपर्क अभियानावर चर्चा झाली.

बैठकीत विविध तालुके, शहर व आघाड्यांच्या पदाधिकाऱ्यांना स्वतंत्र जबाबदाऱ्या देण्यात आल्या. आगामी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गावागावांत बैठका घेणे, युवक व महिला कार्यकर्त्यांना सक्रिय करणे, तसेच समाजातील विविध घटकांपर्यंत पक्षाची भूमिका पोहोचविण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच शेवगाव येथील कार्यक्रमात रिपब्लिकन पक्ष नगर दक्षिणच्या वतीने ना. आठवले यांची केंद्रात राज्य मंत्रीपद तिसऱ्यांदा निवड झाल्याबद्दल व राज्यसभा सदस्यपदी तिसऱ्यांदा नियुक्ती झाल्याबद्दल नागरी सत्कार केला जाणार आहे. या सोहळ्यासाठी रिपब्लिकन पक्षातील राज्याचे प्रमुख पदाधिकारी व मित्र पक्षाच्या सर्व नेत्यांना निमंत्रित करण्याचे नियोजन देखील बैठकीत करण्यात आले.

या बैठकीस जिल्हा सरचिटणीस विजय भांबळ, विलास साठे, गणेश कदम, मगरे सर, अंबादास अरोळे, शहर जिल्हाध्यक्ष किरण दाभाडे, युवक जिल्हाध्यक्ष विवेक भिंगारदिवे, अमित काळे, युवक शहराध्यक्ष राहुल कांबळे, महिला जिल्हाध्यक्ष आरती बडेकर, महिला तालुकाध्यक्षा कविता नेटके, महिला शहर जिल्हाध्यक्ष मायाताई जाधव, शेवगाव तालुकाध्यक्ष सतीश मगर, पाथर्डी तालुकाध्यक्ष बाबा राजगुरू, नगर तालुकाध्यक्ष अविनाश भोसले, पारनेर तालुकाध्यक्ष राजू उबाळे, श्रीगोंदा तालुकाध्यक्ष राजाभाऊ जगताप, जामखेड तालुकाध्यक्ष बाळासाहेब शिंदे, पुंडलिक गंगावणे, अशोक शिरसिंग, सोनवणे मामा, युवराज गायकवाड, बापू जावळे, शुभम गायकवाड, शुभम ठोफ्लबे, आंग्रे ताई, जयराम आंग्रे, यशराज शिंदे यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### प्रसाद पाथरकर सी. ए. परीक्षा उत्तीर्ण

अहिल्यानगर - शहरातील नेता सुभाष चौक



येथील लोढा हाइट मधील भांड्याचे व्यापारी पाथरकर ब्रदर्स चे संचालक जालिंदर पाथरकर यांचे चिरंजीव व विजयकुमार पाथरकर यांचे पुतणे प्रसाद पाथरकर हे नुकत्याच झालेल्या सी. ए. परीक्षेत उत्तम गुणांनी उत्तीर्ण झाले आहेत. अत्यंत मेहनती असलेल्या प्रसाद पाथरकर यांना सी. ए. अभय कटारिया यांचे मार्गदर्शन लाभले आहे. या यशाबद्दल त्यांचे साईनाथ रासने, सतीश रासने, कलिका देवी संस्थान अहिल्यानगर चे सर्व पदाधिकारी, कालिका नागरी सहकारी पतसंस्थेचे सर्व पदाधिकारी तसेच जिल्हा परिषद कर्मचारी सोसायटीचे चेअरमन संजय कडूस यांनी अभिनंदन केले व पुढील प्रगतीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. कासार समाजातील ते दुसरे सी. ए. झाले आहेत. कासार समाज हा अनेक पिढ्यांपासून व्यापारामध्ये असल्याने प्रसाद पाथरकर यांनी मिळवलेल्या यशाचे कौतुक होत आहे.

### आषाढी वारीतील वारकऱ्यांना मिळणार अधिक सक्षम आरोग्य सुविधा

अहिल्यानगर - महाराष्ट्राच्या वैभवशाली



आध्यात्मिक परंपरेचे प्रतीक असलेली आषाढी वारी लाखो वारकऱ्यांच्या श्रद्धा, भक्ती आणि समर्पणाचा सोहळा आहे. राज्याच्या कानाकोपऱ्यातून लहान मुलांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत लाखो वारकरी पायी चालत पंढरपूर येथे विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी जात असतात. या वारकऱ्यांच्या आरोग्याची योग्य काळजी घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय येथे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आषाढी वारी उपाययोजना संदर्भात महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली. या बैठकीत वारकऱ्यांच्या आरोग्य सुरक्षेसंदर्भात महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. ह.भ.प. अमित महाराज घाडगे यांनी महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत अंगीकृत रुग्णालयांच्या माध्यमातून वारकऱ्यांना अधिक व्यापक आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना निवेदन दिले होते. या निवेदनाची गंभीर दखल घेत पालकमंत्र्यांनी जिल्हा प्रशासनाला आवश्यक सूचना दिल्या. यावेळी मार्गदर्शन करताना पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले की, आषाढी वारीत सहभागी होणाऱ्या प्रत्येक वारकऱ्याच्या आरोग्याची काळजी घेणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. पालकमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाच्या माध्यमातून वारकऱ्यांना आवश्यक आरोग्य सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. वैद्यकीय सेवा अधिक परिणामकारक आणि तत्परतेने पोहोचण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करावे. वारीदरम्यान कोणत्याही वारकऱ्याला उपचाराविना राहावे लागू नये, यासाठी आवश्यक ती सर्व व्यवस्था करण्यात यावी, असे निर्देश त्यांनी दिले.

### माहिती अधिकार नियमांतील दुरुस्त्या मागे घेण्यासाठी वकिलांचा एल्गार

अहिल्यानगर- माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत करण्यात आलेल्या नियमांतील दुरुस्त्या मागे घेण्याच्या मागणीसाठी महाराष्ट्रभर 'रणगाडा हटाओ सत्याग्रह २०२६' उभारण्याचा निर्धार करण्यासाठी सोमवार, दि. २९ जून रोजी अहिल्यानगर येथील बार रूममध्ये वकिलांची महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीत आंदोलनाची पुढील दिशा ठरविण्यात येणार असून, ही बैठक बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. कृष्णा झावरे यांच्या अध्यक्षतेखाली होणार असल्याची माहिती ॲड. कारभारी गवळी यांनी दिली.माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत होणाऱ्या कार्यवाहीत वकिलांना सहभागी होण्यास प्रतिबंध घालण्यात आल्याचा गंभीर आरोप यावेळी करण्यात आला आहे. अशा प्रकारच्या दुरुस्त्या या लोकशाही, पारदर्शक शासनव्यवस्था आणि नागरिकांच्या माहितीच्या अधिकारावर थेट आघात करणाऱ्या असल्याचे मत वकील वर्गातून व्यक्त होत आहे. ॲड. कृष्णा झावरे यांनी म्हटले की, ''पारदर्शक आणि जबाबदार शासनाशिवाय कोणतीही लोकशाही टिकू शकत नाही. माहिती अधिकार कायदा हा सामान्य नागरिकाच्या हातातील लोकशाहीतील सर्वात प्रभावी शस्त्र आहे.

## सिंचन सुधारणा कार्यक्रमातंर्गत प्रकल्पांसाठी नाबार्डच्या माध्यमातून निधी उभाणार

### मंत्री विखे पाटील यांची माहीती



**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** महाराष्ट्र सिंचन सुधारणा कार्यक्रमातर्गत विविध प्रकल्पांसाठी नाबार्डच्या माध्यमातून निधी उपलब्ध करण्यात येईल. कार्यक्रमाच्या टप्पा दोन अंतर्गत होणाऱ्या या कामातून कृष्णा खोरे आणि गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळा अंतर्गत विविध सिंचन प्रकल्पातील कामांसाठी गती मिळेल असा विश्वास जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केला.

मंत्रालयात जलसंपदा मंत्री विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. याप्रसंगी आमदार सत्यजित पाटील , आमदार अमोल जगताप, जलसंपदा विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, सचिव संजय बेलसरे, कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक डॉ हनुमंत धुमाळ, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळचे कार्यकारी संचालक जयंत गवळी उपस्थित होते.

मंत्री विखे पाटील म्हणाले, महाराष्ट्र सिंचन सुधारणा कार्यक्रम राज्यातील पूर्ण झालेल्या १५५ जलसिंचन प्रकल्पांच्या कालवे व वितरण प्रणालीमध्ये सुधारणा करण्याच्या कामासाठी ५ हजार ३६ कोटी रुपये तरतुदीसाठी प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. नाबार्ड च्या माध्यमातून निधी उपलब्धतेच्याया दृष्टीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा करून कामास गती दिली जाईल. अपूर्ण सिंचन प्रकल्प तसेच पूर्ण प्रकल्पांच्या वितरण प्रणालीमध्ये सुधारणा करणेसाठी या टप्प्यातील ७५०० कोटीपैकी गोदावरी व कृष्णा खो–यात निधी उपलब्ध होणार असून सदयस्थिती झालेला खर्चबाबतचा आढावा घेण्यात आला. मंत्रिमंडळ बैठकीत यापूर्वीच महाराष्ट्र सिंचन सुधारणा कार्यक्रमांतर्गत निर्मित सिंचन क्षमता व प्रत्यक्ष सिंचन क्षमता यामधील तफावत दूर करण्याच्या दृष्टीने प्रथम टप्यात महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे अंतर्गत २१ प्रकल्पांना व गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, छत्रपती संभाजीनगर अंतर्गत १० प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. यामध्ये महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे आणि गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, छत्रपती संभाजीनगर एकूण ३१ प्रकल्पांच्या बाबत चर्चा करण्यात आली. गोदावरी उजवा तट कालवा प्रकल्पाचा टप्पा २ मधून टप्पा १ मध्ये समावेश करण्यात आला आहे. तसेच प्रवरा डावा व उजवा कालवा दुरुस्ती व भोजापूर मध्यम प्रकल्प या प्रकल्पांचा प्रथम टप्यात नव्याने समावेश करण्यात आला आहे अशी माहिती यावेळी देण्यात आली.

## शिर्डीतील चारी वादावर तोडगा; उपनगराध्यक्ष अभय शेळके यांच्या मध्यस्थीनंतर काम स्थगित

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**



**शिर्डी –** आगामी कुंभमेळ्याच्या धर्तीवर शिर्डीत प्रशासनाच्या वतीने विविध कामे सुरू करण्यात आली असून शिर्डी नगरपरिषद हद्दीतील चारी नंबर बारा ही बंदिस्त करून त्यावर रस्ता करण्याचे नगरपरिषदेचे प्रयोजन आहे मात्र ज्या भागातून ही चारी जाते त्या भागातील काही शेतकरी बांधव व ग्रामस्थांनी सदर चारी भूमिगत करण्यास तीव्र विरोध दर्शविला असून आधी मोजणी करावी परिसरातील बाधित शेतकऱ्यांची बैठक घेत भावना जाणून घ्याव्यात व तोवर काम बंद ठेवण्यात यावे अशी मागणी एका निवेदनाद्वारे येथील शेतकऱ्यांनी नगरपरिषदेकडे केली आहे. यावेळी बाधित शेतकरी ग्रामस्थांनी प्रशासनावर, उपनगराध्यक्ष अभय भैय्या शेळके,उत्तम भैय्या कोते यांसह मुख्याधिकारी सतीश दिघे यांच्या कार्यपद्धतीवर ताशेरे ओढत अधिकाऱ्यांची एकाधिकार शाही असल्याचे सांगत मनमानी पद्धतीने मुख्याधिकारी कारभार करत असल्याचा आरोप केला असून मुख्याधिकारी सतीश दिघे यांच्याशी याबाबत संपर्क केला असता तो होऊ शकला नाही

शिर्डीतील बारा नंबर चारी बाबत त्या भागातील शेतकरी ग्रामस्थ यांनी चारी बंदिस्त करू नये अशी भूमिका घेत काम बंद पाडल्याने प्रशासनासमोर पेच निर्माण झाला असताना याविषयावर मार्ग निघणार का असा सवाल निर्माण झाला होता मात्र याबाबत उपनगराध्यक्ष अभय भैय्या शेळके यांना विचारले असता त्यांनी संबंधित शेतकरी ग्रामस्थांशी प्रत्यक्ष ठिकाणी जात चर्चा केली असून त्यांचा गैरसमज झाला आहे ही चारी जरी बंदिस्त केली तरी ना राधाकृष्ण विखे पाटील व डॉ सुजय विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शिर्डीच्या विकासाबरोबर शेतकरी बांधवांचा पाण्याचा प्रश्न सुद्धा ऐरणीवर येऊ नये यासाठी रेन हार्वेस्टिंग सारखा प्रयोग करण्याचा आमचा प्रामाणिक प्रयत्न आहे मात्र शेतकरी बांधवांचा सूर बघता सध्या स्थितीला काम बंद ठेवत आधी मोजणी करून पुढील निर्णय घेतला जाईल असे म्हणत याबाबत लवकरच सकारात्मक निर्णय होईल अशी अपेक्षा उपनगराध्यक्ष अभय भैय्या शेळके यांनी व्यक्त केली आहे.

## कल्याणीताई कवडे यांचे दु:खद निधन

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** वाघ गल्ली, नालेगाव येथील रहिवासी सौ. कल्याणीताई सुनील कवडे (वय ४५) यांचे २१ जून रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पती, दीर, जावा , २ मुले, १ मुलगी, पुतने,जावई, नातवंडे, सासू , सासरे असा परिवार आहे. सहाय्यक फौजदार



सुनील कवडे यांच्या त्या पत्नी तर नगरसेवक गणेश कवडे यांच्या मोठ्या भाऊजयी होत. कल्याणी ताई यांच्या अचानक निधनामुळे नालेगाव, कल्याण रोड,दिल्ली गेट, मानकर गल्ली, चौपाटी कारंजा परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. कल्याणी ताई यांच्या अंत्यविधी वेळी आमदार संग्राम जगताप तसेच महानगरपालिकेचे सर्व नगरसेवक, महानगरपालिकेचे अधिकारी, कर्मचारी, पोलीस प्रशासनातील अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शरीर, मन व बुद्धीसाठी नियमित योगा व प्राणायाम फायदेशीर – ॲड. बाबासाहेब खिलारी

### ढोकेश्वर विद्यालयात योग दिन उत्साहात साजरा



**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**पारनेर–** दररोज नियमित योगा आणि प्राणायाम केल्याने, शुगर, रक्तदाब, लठ्ठपणा कंट्रोल मध्ये राहतो, रक्ताभीसरण सुधारते. म्हणून नियमित योगा आणि प्राणायाम शरीर, मन व बुद्धीसाठी फायदेशीर आहे. असे प्रतिपादन पारनेर तालुका खरेदी विक्री संघाचे माजी चेअरमन ॲड. बाबासाहेब खिलारी यांनी केले.श्री ढोकेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात २१ जून हा जागतिक योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ॲड. खिलारी बोलत होते.

योगदिनाच्या निमित्ताने विद्यालयात माजी सूबेदार आणि टाकळी ढोकेश्वर परिसरातील योगाचार्य मेजर गणपत ठाणगे यांनी विद्यालयातील विद्यार्थ्यांना योगाचे धडे दिले. यावेळी योगासने करता–करता विद्यार्थ्यांना योगाचे महत्व देखील समजावून सांगितले. मेजर ठाणगे म्हणाले की, नियमित योगामुळे तुम्ही नेहमी तंदुरुस्त व निरोगी रहाल. यावेळी महर्षी पतंजली यांच्या प्रतिमेची पूजा करून योगा व प्राणायमाला सुरुवात केली.

योगदिनाच्या पूर्व संध्येला शनिवारी प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या उज्वला दीदी यांनी देखील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्या बोलताना म्हणाल्या की, आपण सात्विक अन्नग्रहण केले पाहिजे. व्यसनाला दूर ठेवले पाहिजे. दररोज ''ओमं ध्वनी'' म्हटल्यास सकारात्मक व्यक्तिमत्व घडते. एकाग्रता वाढते. यावेळी विद्यार्थ्यांना व्यसनमुक्तीची शपथ देखील देण्यात आली

यावेळी प्राचार्य बाळासाहेब खिलारी, पर्यवेक्षक बाळासाहेब निवडुंगे, समन्वयक अशोक गांगड. रवींद्र मते, बाबासाहेब जाधव, अतुल सैद, माजी प्राचार्य प्रकाश इघे, भाऊसाहेब हिंगडे, राजेंद्र ढोणे, पोपट जगदाळे , अशोक वाघ, सचिन महानवर, आतिष झावरे, सुनिल झावरे, मंगेश पोपळघट, नारायण शेळके, निलेश जासूद, नितीन ढोकळे, श्रीरंग धामणे, संदीप महाडूळे, विष्णू भद्रे, निलम खिलारी, सोनल रोहोकले, सुरेखा ठाणगे, कल्पना जाधव, सुमन वाळुंज , प्रिया डव्हणे, पवन कुटे, भास्करराव झावरे, दीपक गुंदेचा, साहिल गुंदेचा, छाया माता, ढोकेश्वर वसतिगृहाचे अधीक्षक बाळासाहेब रोकडे, धोंडिभाऊ झावरे, नारायण हरेल, अमोल गोरे, श्रीम. घोडके, इत्यादी शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी आणि पालक उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक ह. भ. प. रविंद्र महाराज मते यांनी केले तर आभार भाऊसाहेब हिंगडे यांनी मानले.

### अहिल्यानगर योगमय! आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा

## योगामुळे शरीरस्वास्थ्याबरोबरच मन:शांतीही लाभते - महापौर ज्योतीताई गाडे

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जिल्हा प्रशासन, महानगरपालिका, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, काका स्ट, क्रीडा भारती व विविध योग संस्था व एकविध खेळ संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने शहरात बारावा आंतरराष्ट्रीय योग दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. रविवारी (दि.२१ जून) सकाळी सावेडी येथील जॉगिंग पार्कच्या मैदानात हा योगमय सोहळा रंगला होता.

निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते व महापौर ज्योतीताई गाडे यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने आंतरराष्ट्रीय योग दिवस कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषद माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी संध्याताई गायकवाड, जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे, क्रीडा भारतीचे चंद्रशेखर कुलकर्णी, अभय महाजन, डॉ. रविंद्र साताळकर, डॉ. हर्षवर्धन तन्वर, गिरीश कुलकर्णी, शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेते निर्मल थोरात, सुनील जाधव, मनीषा पुंडे व कोमल वाकळे बरोबरच महानगरपालिकेचे नगरसेवक व नगरसेविका क्रीडा संघटनांचे पदाधिकारी शैलेश गवळी, संजय साठे, मनीष राठोड शहरातील विविध शाळा व महाविद्यालयांचे विद्यार्थी, मुख्याध्यापक, क्रीडा शिक्षक, खेळाडू, पालक असे २



हजारपेक्षा अधिक नागरिक यांची योग दिन कार्यक्रमाकरिता उपस्थित होते.

महापौर ज्योतीताई गाडे म्हणाल्या की, प्राचीन काळापासून भारतीय संस्कृतीत योगाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. आजच्या धकाधकीच्या जीवनशैलीत शरीरस्वास्थ्याकडे दुर्लक्ष होत असताना योगामुळे केवळ शरीर निरोगी राहत नाही, तर मानसिक शांतता आणि सकारात्मक ऊर्जा देखील प्राप्त होते. त्यामुळे प्रत्येकाने योगाला आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनवावे, असे आवाहन त्यांनी केले.

निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते म्हणाले की, योग ही आरोग्याची गुरुकिल्ली असून निरोगी जीवनासाठी नियमित योगाभ्यास आवश्यक आहे. योगामुळे शारीरिक आणि मानसिक आरोग्य सुदृढ राहण्यास मदत होते. जिल्हावासीयांनी नियमित योग करून आरोग्यदायी जीवनशैलीचा स्वीकार करण्याचे त्यांनी स्पष्ट केले.

एम.एम.वाय.टी.सी. संस्थेच्या अनुभवी योग प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित सामूहिक योगसत्रात प्रार्थना, सूक्ष्म व्यायाम, विविध योगासने, सूर्यनमस्कार, प्राणायाम आणि ध्यानधारणा यांचे प्रभावी सादरीकरण करण्यात आले. प्रार्थनेने प्रारंभ झालेल्या या कार्यक्रमात उपस्थित साधकांनी वृक्षासन, अर्धचक्रासन, त्रिकोणासन तसेच बैठक स्थितीतील विविध आसनांचा उत्साहपूर्ण सराव करून योगाभ्यासात सक्रिय सहभाग नोंदविला.

यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते यांनी उपस्थितांना शारीरिक, मानसिक आणि भावनिक संतुलन राखण्याचा संकल्प करून शपथ दिली. 'ओम सर्वे भवन्तु सुखिनः' या मंगल प्रार्थनेने वातावरण भक्तिमय झाले. अखेरीस राष्ट्रगीताने या उत्साहपूर्ण आणि प्रेरणादायी योग सोहळ्याची सांगता करण्यात आली.

## संत भगवानबाबा ऊसतोड कामगारांच्या मुला-मुलींसाठी शासकीय वसतिगृह प्रवेश प्रक्रिया सुरू

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत शेवगाव येथे सुरू करण्यात आलेल्या संत भगवानबाबा ऊसतोड कामगारांच्या मुलांचे व मुलींचे शासकीय वसतिगृहात शैक्षणिक वर्ष २०२६–२७ साठी प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. पात्र विद्यार्थ्यांनी व पालकांनी या सुविधेचा लाभ घेण्यासाठी अर्ज सादर करावेत, असे आवाहन गृहपाल बाळासाहेब बडे यांनी केले आहे.

शेवगाव येथे ऊसतोड कामगारांच्या पाल्यांसाठी प्रत्येकी १०० मुले व १०० मुलींची निवासी व्यवस्था असलेले शासकीय वसतिगृह कार्यरत आहे. या वसतिगृहामध्ये इयत्ता पाचवीपासून पदवीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येणार आहे. वसतिगृहात प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना मोफत निवास, मोफत भोजन तसेच विविध शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

प्रवेशासाठी अर्जदार महाराष्ट्राचा रहिवासी असणे आवश्यक असून मुलगा अथवा मुलगी ऊसतोड कामगारांचा पाल्य असावा. यासाठी संबंधित ग्रामसेवकाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थी शेवगाव शहरातील कोणत्याही शाळा किंवा महाविद्यालयात प्रवेशित असणे बंधनकारक आहे.

प्रवेशासाठी ग्रामसेवकाचे प्रमाणपत्र, मागील इयत्तेचे गुणपत्रक, शाळा सोडल्याचा दाखला अथवा बोनाफाईड प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला, जातीचा दाखला, आधार कार्ड, बँक खाते तपशील, रेशनकार्ड, रहिवासी दाखला किंवा स्वयंघोषणापत्र आदी आवश्यक कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृह, आखेगाव रोड, शेवगाव येथे प्रत्यक्ष अथवा ७९७२२६८५०० या क्रमांकावर संपर्क साधावा, असेही कळविण्यात आले आहे.

## केडगाव शाहूनगरमध्ये कॉँक्रिटीकरण रस्त्याच्या कामाचे भुमीपूजन

### विकासकामे ही केवळ आश्वासने न राहता प्रत्यक्षात नागरिकांपर्यंत पोहोचली पाहिजेत – नगरसेवक अमोल येवले

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** प्रभाग क्रमांक १६ मधील केडगाव, शाहूनगर भागातील स्वामी समर्थ केंद्र परिसरातील सिमेंट कॉंक्रिटीकरण रस्त्याच्या कामाचे भुमीपूजन नागरिकांच्या हस्ते करण्यात आले. अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेला रस्त्याचा प्रश्न मार्गी लागल्याने परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले.



या रस्त्याच्या कामासाठी सुमारे २० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करण्यात आला असून, आमदार संग्राम जगताप व माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या विशेष प्रयत्नातून हे विकासकाम पूर्ण होत आहे.

यावेळी नगरसेवक अमोल येवले म्हणाले की, ''प्रभागातील नागरिकांना चांगले रस्ते, पाणी, ड्रेनेज व मूलभूत सुविधा मिळाव्यात यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. शाहूनगर भागातील हा महत्त्वाचा रस्ता पूर्ण झाल्यामुळे नागरिकांची गैरसोय दूर होणार आहे. विकासकामे ही केवळ आश्वासने न राहता प्रत्यक्षात नागरिकांपर्यंत पोहोचली पाहिजेत, हा आमचा प्रयत्न आहे. पुढील काळातही प्रभागातील प्रलंबित प्रश्न टप्प्याटप्प्याने मार्गी लावण्यात येतील.

यावेळी नगरसेविका सुनीत कांबळे म्हणाल्या की, नागरिकांच्या समस्या समजून घेऊन त्या सोडवण्यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्न करत आहोत. शाहूनगर परिसरातील या रस्त्यामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असून विकासकामांना प्राधान्य देऊन प्रभागाचा सर्वांगीण विकास करण्याचा आमचा प्रयत्न आहे. नागरिकांच्या सहकार्यामुळे ही कामे अधिक प्रभावीपणे पूर्ण होत आहेत.

उद्घाटनप्रसंगी नगरसेवक अमोल येवले, नगरसेवक विजय पठारे, नगरसेविका वर्षा काकडे, नगरसेविका सुनिता कांबळे, सुजित काकडे, अजित कातोरे, राजु सोले, प्रकाश बिडकर, नलगे, बोरुडे सर, चौधरी, तात्या, ढवळे, सुहास साबळे, अस्मिता इथापे, राणी सोले, आफरीन शेख, बोरुडे मावशी, हिराबाई इथापे, वृषाली टिमकरे, मैड मावशी परिसरातील महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आई - वडील यांचे पूजन करून मदर - फादर डे साजरा करावा- रवींद्र महाराज आव्हाड




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आई - वडील हेच खऱ्या अर्थाने जीवनाचे पहिले गुरू आहेत. प्रत्येकांसाठी ते देवस्वरूप आणि आधारस्तंभ आहेत, त्यांच्या चरणी नतमस्तक होणे म्हणजे आपल्या संस्कृतीचा सन्मान होय.केवळ मदर,फादर डे च्या दिवशी स्टेटस ठेवून आदर व्यक्त न करता आई-वडिलांचे पूजन करून डे साजरा करावा. असे प्रतिपादन हभप रविंद्र महाराज आव्हाड यांनी केले.

तपोवन रोडवरील रिद्धी - सिद्धी निवास मध्ये मातृ-पितृ पूजन सोहळा करून फादर डे साजरा करण्यात आला.यावेळी हभप महादेव महाराज वडुलेकर व सौ. शकुंतलाबाई महादेव आव्हाड यांचे चरण पूजन करण्यात आले. हभप कानिफनाथ महाराज पंडित यावेळी उपस्थित होते.

बरेच दिवसांपासून वडील आजारी होते,फादर डे च्या दिवशीच आजारावर मात करून घरी परतले असता त्यांचा कुटुंबासाठी असलेला त्याग, त्यांचे प्रेम आणि संस्कार यांचा गौरव म्हणून फादर डे ला त्यांचे चरण पूजन करण्यात आले. असे रविंद्र आव्हाड यांनी सांगितले.

ते पुढे म्हणाले माता पिता चरणी देवाचे दर्शन घडे, त्यांच्या आशीर्वादे जीवन मंगल वाढे,सेवा करिता त्यांची पुण्य सदा लाभे या अभंगाप्रमाणे हा सोहळा संपन्न झाल्याने मनाला खूप मोठे समाधान मिळाले. आपल्या वडिलांविषयी प्रेम, आदर व्यक्त करताना रवींद्र महाराज म्हणाले सात पिढ्यांपासून पांडुरंगाची वारी, २४ वर्षे दत्तात्रयांचे अनुष्ठान, प्रत्यक्ष भेट तसेच ज्ञानेश्वरी, गाथा, गीता, भागवत, रामायण, तुकाराम गाथा यांचा अभ्यास करून हजारो तरुणांना व्यसनमुक्त करीत, ज्ञानदानाचे कार्य त्यांनी केले. अशा माझ्या पितृदेवांचा शंकराचार्य भारती तीर्थ महास्वामी यांच्या हस्ते गौरव झाला होता.त्यांचा फादर डे ला पूजन करण्याचा मला मान मिळाला हे माझे भाग्य आहे. आई-वडिलांचे केवळ डे च्या दिवशी प्रेम व्यक्त न करता त्यांचा उतारवयात सांभाळ करा, त्यांची सेवा करा यामध्येच तुम्हाला भगवंत दिसेल.असे आवाहन त्यांनी केले.

# वि.ल. कुलकर्णी शाळेत प्रवेशोत्सव, योग दिन आणि सेवापूर्ती सोहळा उत्साहात

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** १५ जूनला शाळेची घंटा वाजली अन चिमुकल्यांची पाऊले शाळेकडे वळली. फुग्यांची कमान , रंगीबेरंगी रांगोळ्या आणि फुलांच्या तोरणांनी सजलेल्या दि प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या वि.ल.कुलकर्णी शाळेच्या प्रांगणात इयत्ता पहिली मध्ये प्रवेश झालेल्या नवागतांचे औक्षण करून नि गुलाब पुष्प देऊन स्वागत झाले.

शाळा प्रवेशोत्सव व मोफत पाठ्यपुस्तक वितरणकार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणूनलाभलेल्या नगरसेविकासौ.आशाताई किशोरडागवालेयांनी विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षाच्या शुभेच्छा दिल्या व शालेय उपक्रमांमध्ये सहभागी होण्यास प्रेरित केले.

नवीन शैक्षणिक वर्ष सुरू झाले असल्यामुळे शिक्षक आमदार माननीय श्री. सत्यजित तांबे यांच्या सुविद्य पत्नी व संगमनेर शहराच्या नगराध्यक्षा सौ. मैथिली तांबे यांनी शाळेस सदिच्छा भेट दिली व विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षाच्या शुभेच्छा दिल्या.

१२व्या आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधत २१ जून रोजी योगशिक्षक श्री. राजेंद्र घुले व श्री रवी वराळ यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेच्या प्रांगणात संस्थेच्या सर्व विभाग प्रमुख ,शिक्षक वृंद व विद्यार्थी यांनी योग प्रात्यक्षिके केली. योग प्रार्थनेने सुरू झालेल्या या प्रात्यक्षिकांमध्ये आसने , प्राणायाम व ओंकाराचे महत्त्व श्री. राजेंद्र घुले यांनी विशद केले.

३१ मे रोजी सेवानिवृत्त झालेल्या शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. विद्या खडके व उपशिक्षक श्री. गऊराम कदम यांच्या सेवापूर्ती निमित्त आयोजित करण्यात आलेला सत्कार समारंभ उत्साह पूर्ण पण काहीशा भावनिक वातावरणात संपन्न झाला.



यावेळी संस्थेच्या वतीने तसेच शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वृंद यांच्या वतीने दोन्ही सत्कारमूर्तींचा सपत्नीक शाल , श्रीफळ , पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन गौरव करण्यात आला. याप्रसंगी शाळेच्या नूतन मुख्याध्यापिका सौ. वैशाली भारदे यांनी सौ.विद्या खडके यांच्या ३८ वर्षांच्या सेवाकाळात त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता , संस्कार व शिस्त रुजविण्यासाठी केलेल्या कार्याचे कौतुक केले.तसेच श्री. गऊराम कदम यांनी ३४ वर्षे केलेल्या विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रामाणिक , निष्ठावान व कर्तव्यदक्ष सेवेला गौरवपूर्ण शब्दात उजाळा दिला. यावेळी विद्यार्थ्यांनी देखील आपल्या आठवणी जाग्या केल्या .

सेवापपूर्ती प्रसंगी मनोगत व्यक्त करताना दोन्ही सत्कारमूर्तींनी संस्था, सहकारी शिक्षक , शिक्षकेतर कर्मचारी , पालक व विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक आभार मानले व जीवनाचे ध्येय पूर्ण करण्यासाठी सचोटीने प्रयत्न करण्यासाठी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती विजयाताई रेखे यांच्या सहस्त्रचंद्रदर्शन सोहळ्याच्या निमित्ताने शाळेतील विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षपदावरून बोलताना संस्थेचे सेक्रेटरी श्री. किरण वैकर यांनी दोघांनाही सेवा परम धर्म या उक्तीप्रमाणे केलेल्या कार्याचे कौतुक करत शुभेच्छा दिल्या. तसेच आयुष्याचा प्रत्येक क्षण मोलाचा आहे हे पटवून देताना विद्यार्थ्यांनी प्रत्येक क्षण काहीतरी नवे करण्याचा संदेश दिला.

कार्यक्रमास उपस्थित संस्थेचे उपाध्यक्ष श्री. चंद्रशेखर कुलकर्णी , खजिनदार श्री. उमेश रेखे , मान्यवर पदाधिकारी श्री. महेशजी रेखे , श्री. उदयकुमार भणगे प्राचार्य श्री. सुनील पंडित आणि सर्व शिक्षक व विद्यार्थी यांनी दोन्ही सत्कारमूर्तींना निरोगी ,आनंदी व यशस्वी निवृत्त जीवनासाठी शुभेच्छा दिल्या.

# नगरपरिषदेचे मटन व मच्छी मार्केट गैरप्रकारांचे केंद्र?

**गांजा, दारू सेवनामुळे नागरिकांमध्ये संताप; मटन मार्केट त्वरित सुरू करण्याची मागणी**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** पैठण नगरपरिषदेच्या मटन व मच्छी मार्केट परिसरात रोजच दारू आणि गांजाचे सेवन होत असल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. संबंधित मटन मार्केट बंद अवस्थेत असल्याने काही असामाजिक घटकांनी येथे अड्डा निर्माण केल्याची चर्चा परिसरात सुरू आहे. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, नगरपरिषदेने उभारलेले मटन व मच्छी मार्केट नियमितपणे सुरू नसल्यामुळे जागेचा गैरवापर वाढला आहे. परिसरात उघडपणे दारू पिणे, गांजाचे सेवन करणे तसेच अस्वच्छता वाढल्याने नागरिक, महिला व व्यावसायिकांना त्रास सहन करावा लागत आहे. विशेष म्हणजे, शहरातील खाटीक व्यावसायिकांकडून उघड्यावर मटन विक्री केली जात असल्याने मार्केट व्यवस्थापनाचा उद्देशच फोल ठरत असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे. नगरपरिषदेने अधिकृत मटन व मच्छी मार्केट कार्यान्वित करून सर्व विक्रेत्यांना त्याठिकाणी स्थलांतरित करावे, अशी मागणी होत आहे. दरम्यान, संबंधित ठिकाणी वाढत असलेल्या गैरप्रकारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी नगरपरिषद व पोलिस प्रशासनाने संयुक्तपणे कारवाई करावी, तसेच बंद पडलेले मटन व मच्छी मार्केट तातडीने सुरू करावे, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे. यामुळे परिसरातील असामाजिक प्रकारांना आळा बसून स्वच्छ व नियोजित मार्केट व्यवस्था निर्माण होईल, असा विश्वास नागरिकांनी व्यक्त केला आहे.

# भाजपाच्या वतीने शुक्रवारी नवनिर्वाचित आमदारांचा सत्कार सोहळा

**जलसंपदा मंत्री विखे पाटील आणि सभापती प्रा.राम शिंदे यांची उपस्थिती**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर जिल्ह्यातील नवनिर्वाचित आमदारांचा नागरी सत्कार समारंभ शुक्रवार दि.२६जून रोजी भारतीय जनता पक्षाच्या वतीने आयोजित करण्यात आला असल्याची माहीती भाजपाचे जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर, दिलीप भालसिंग आणि शहराचे अध्यक्ष अनिल मोहीते यांनी दिली.

नुकत्याच संपन्न झालेल्या राहुरी विधानसभा आणि विधानपरीषदेची निवडणुक संपन्न झाली. राहुरी विधनासभा पोटनिवडणुकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष आ.रविंद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली महायुतीचे उमेदवार आ.अक्षय कर्डीले मोठ्या मताधिक्याने विजयी झाले. विधान परीषदेच्या निवडणुकीत अहील्यानगरचे भूमीपुत्र आणि गेली अनेक वर्षे पक्षाच्या संघटनात्मक कार्यात योगदान देणारे सुनिल कर्जतकर यांची विधान परिषदेचे सदस्य म्हणून निवड झाली. आ.विवेक कोल्हे आ.प्राजक्त तनपुरे यांचीही विधनापरिषद निवडणुकीत बिनविरोध झालेली निवड ही भारतीय जनता पक्षाच्या संघटनात्मक आणि जिल्हयाच्या विकासात्मक वाटचालीला आणि पाठबळ देणारे आहे.

अहील्यानगर जिल्हा भारतीय जनता पक्षाच्या वतीने शुक्रवार दि.२६जून २०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता जिल्हा सहकारी बँकेच्या सहकार सभागृहात जलसंपदा तथा पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आणि विधान परीषदेचे सभापती प्रा.राम शिंदे यांच्या उपस्थितीत सर्व नवनिर्वाचित आमदारांच्या नागरी सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला असल्याचे पक्षाच्या वतीने सांगण्यात आले.

या सत्कार सोहळ्यास जिल्ह्यातील महायुतीच्या सर्व आमदार नगराध्यक्ष आणि नगरसेवक यांना निमंत्रित करण्यात आले असून, या समारंभास महायुतीच्या सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहाण्याचे आवाहन भारतीय जनता पक्षाच्या वतीने करण्यात आले आहे.

# जांभूळ वाहून नेणारे पिकअप पलटी

**रस्त्यावर पडलेल्या जांभुळांसाठी नागरिकांची झुंबड**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** धुळेसोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील पैठण तालुक्यातील मुरमा शिवाराजवळ जांभूळ वाहून नेणारे पिकअप वाहन अचानक पलटी झाल्याची घटना घडली. अपघातात वाहनाचे नुकसान झाले असून सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाल्याची माहिती नाही. दरम्यान, वाहनातील जांभूळ मोठ्या प्रमाणावर रस्त्यावर विखुरल्याने परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी गर्दी केली.

रस्त्यावर पडलेली जांभुळे घेण्यासाठी नागरिकांची एकच झुंबड उडाल्याचे चित्र पाहायला मिळाले. काही काळ महामार्गावर गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी मदतीसाठी धाव घेतली. अपघाताचे नेमके कारण समजू शकले नसले तरी वाहनावरील चालकाचे नियंत्रण सुटल्याने हा अपघात झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. पुढील तपास सुरू आहे.

# मुकिंदापूर हद्दीतील ओपन स्पेस तसेच ॲम्युनिटीवर भूमाफियांचा डोळा

**मंगल कार्यालयांसारखे मोठे व्यवसाय थाटून नियमाची पायमल्ली**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**नेवासा–** मुकिंदापूर हद्दीतील रहिवासी नागरिकांच्या हक्काच्या अमेनिटी स्पेस तसेच ओपन स्पेस (खुली जागा) वर आता मोठ्या व्यावसायिकांनी डल्ला मारण्यास सुरुवात केली आहे. लहान मुलांच्या खेळासाठी आणि नागरिकांच्या आरोग्यासाठी राखीव असलेल्या या मोकळ्या जागांवर चक्क मंगल कार्यालयासारखे मोठे व्यावसायिक प्रकल्प थाटले गेल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. प्रशासनाच्या उघड पाठिंब्यामुळेच हा प्रकार सुरू असल्याचा गंभीर आरोप स्थानिक रहिवाशांमधून केला जात आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, शासकीय नियमांनुसार कोणत्याही गृहप्रकल्पात किंवा ले-आऊटमध्ये नागरिकांच्या सार्वजनिक वापरासाठी अमेनिटी/खुली जागा (ओपन स्पेस) सोडणे बंधनकारक असते. मुकिंदापूर हद्दीत अशा अनेक जागा सोडण्यात आल्या आहेत. मात्र, या जागांवर देखरेख ठेवण्यात स्थानिक प्रशासन पूर्णपणे अपयशी ठरले आहे. याचाच फायदा घेत काही बड्या धनदांडग्यांनी आणि व्यावसायिकांनी थेट या जागेवरच कब्जा केला आहे. छोट्या-मोठ्या टपऱ्या सोडून आता थेट *भव्य मंगल कार्यालये, लॉन आणि मोठे कमर्शियल शेड* या ओपन स्पेसमध्ये उभारण्यात आले आहेत.

*नागरिकांचे जगणे असह्य; वाहतूक कोंडी आणि अस्वच्छतेचा विळखा

निवासी भागात मंगल कार्यालयासारखे मोठे व्यावसायिक प्रकल्प सुरू झाल्यामुळे परिसरातील शांतता पूर्णपणे भंग पावली आहे. लग्नकार्ये आणि इतर समारंभांमुळे या निवासी भागात रात्री-अपरात्री मोठ्या आवाजात डीजे वाजवले जातात, ज्यामुळे रुग्ण आणि लहान मुलांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. तसेच, या कार्यालयांमध्ये येणाऱ्या वाहनांमुळे मुकिंदापूर हद्दीतील अंतर्गत रस्त्यांवर प्रचंड वाहतूक कोंडी होत आहे. समारंभानंतर उरलेले खरकटं अन्न आणि कचरा याच खुल्या जागेत उघड्यावर फेकला जात असल्याने परिसरात दुर्गंधी पसरली असून डेंग्यू, मलेरियासारख्या आजारांचा धोका वाढला आहे.

बड्या व्यावसायिकांना प्रशासनाचे अभय? एकीकडे गरीब नागरिकांच्या छोट्या बांधकामांवर हातोडा चालवणारी प्रशासकीय यंत्रणा, दुसरीकडे अमेनिटी /ओपन स्पेसमध्ये थाटल्या गेलेल्या एवढ्या मोठ्या मंगल कार्यालयांकडे आणि व्यावसायिक प्रकल्पांकडे डोळेझाक का करत आहे? असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत. संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांचे आणि या बड्या व्यावसायिकांचे आर्थिक लागेबांधे असल्याशिवाय रहिवासी भागात एवढा मोठा बेकायदेशीर कारभार सुरू राहूच शकत नाही, अशी चर्चा सद्या परिसरात रंगली आहे.

*वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दखल घेण्याची मागणी...

‘‘ओपन स्पेस आणि अमेनिटी स्पेस ही नागरिकांच्या विरंगुळ्यासाठी असते, तिथे मंगल कार्यालय थाटून कोणी स्वतःचे खिसे भरू शकत नाही. या मोठ्या व्यावसायिकांवर तात्काळ गुन्हे दाखल करून ही जागा शासनाने ताब्यात घ्यावी, अन्यथा आम्ही न्यायालयात दाद मागू.‘‘

*संतप्त नागरिक, मुकिंदापूर परिसर.*

आता या बड्या आणि वजनदार व्यावसायिकांच्या बेकायदेशीर कृत्यांवर प्रशासन कारवाईचे धाडस दाखवणार की नेहमीप्रमाणे कागदी घोडे नाचवून या प्रकरणावर पांघरूण घालणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

(पान १ वरुन)

## सर्जेपुऱ्यातील घरफोडीचा तोफखाना पोलिसांकडून छडा

गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून तोफखान्याचे पोलीस निरीक्षक बालाजी वैद्य यांनी गुन्हे शोध पथकाला तपासाचे आदेश दिले. पथकाचे प्रमुख पोलीस उपनिरीक्षक योगेश चाहेर यांनी तात्काळ घटनास्थळाची पाहणी केली. परिसरातील सीसीटीव्ही आणि गोपनीय बातमीदारांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे सिद्धार्थनगर येथील एका विधीसंघर्षीत बालकाला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता, या चोरीत त्याचे दोन साथीदार समाविष्ट असल्याचे समोर आले. पोलिसांनी तात्काळ कारवाई करत या दोघांना अटक केली. आरोपींकडून १ लाख ९० हजार रुपये किमतीची १३ ग्रॅम वजनाची सोन्याची लगड जप्त करण्यात आली आहे.

## जिल्ह्यातील आठ जुगार अड्यांवर छापे

पोलीस उपनिरीक्षक दीपक मेढे आणि राजेंद्र वाघ यांच्या नेतृत्वाखाली दोन विशेष पथके तयार केली. या पथकात पोलीस अंमलदार विजय पवार, अरविंद भिंगारदिवे, योगेश भिंगारदिवे, रिचर्ड गायकवाड, रमिजराजा आतार, विशाल तनपुरे आणि योगेश कर्डीले यांचा समावेश होता.दिनांक २२ जून रोजी या पथकांनी विविध ठिकाणी छापे टाकले. त्यात श्रीरामपूरमध्ये सहा, कोतवाली हद्दीत एक व तोफखाना हद्दीत एक असे एकूण आठजणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सर्वाधिक कारवाई श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत झाली असून, तेथून १ लाख ६१ हजार रुपयांपेक्षा जास्त मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

## शहरातील एकही बालक पोलिओ डोसपासून वंचित राहणार नाही - महापौर

महानगरपालिका आरोग्य विभागामार्फत शहरातील सर्व पोलिओ बूथचे नियोजन पूर्ण करण्यात आले आहे. आशा सेविका, आरोग्य सेविका आणि आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांमार्फत नागरिकांमध्ये व्यापक जनजागृती करण्यात आली आहे. ते पुढे म्हणाले की, शनिवार दिनांक २७ जून रोजी विविध स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून सायकल व मोटारसायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले असून त्याद्वारे पल्स पोलिओ मोहिमेबाबत व्यापक जनजागृती करण्यात येणार आहे. शहरातील एकही बालक पोलिओ डोसपासून वंचित राहू नये यासाठी विशेष भर देण्यात येत असून सर्व पालकांनी आपल्या बालकाला पोलिओचा डोस देण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.डॉ. वृषाली आरु यांनी पल्स पोलिओ मोहिमेबाबत सविस्तर माहिती देताना मोहिमेचे स्वरूप, लाभार्थी बालकांची संख्या, पोलिओ बूथचे नियोजन, आरोग्य कर्मचाऱ्यांची नियुक्ती, जनजागृती उपक्रम तसेच विशेष पथकांच्या कार्यपद्धतीबाबत मार्गदर्शन केले.यावेळी रोटरी क्लबच्या वतीने तयार करण्यात आलेल्या पल्स पोलिओ जनजागृती फलकाचे अनावरण महापौर ज्योतीताई गाडे आणि महिला व बालकल्याण समिती सभापती दिपालीताई बारस्कर यांच्या हस्ते करण्यात आले.राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी महानगरपालिका प्रशासन, आरोग्य विभाग, स्वयंसेवी संस्था आणि नागरिक यांच्या संयुक्त सहभागातून शहरातील प्रत्येक बालकापर्यंत पोहोचण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

## सायबर गुन्ह्यांवर सभागृहात आमदार दाते सरांचा घणाघात

सायबर सुरक्षा संदेश प्रसारित केले जात असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, आमदार काशिनाथ दाते यांनी वाढत्या सायबर फसवणुकीमुळे सर्वसामान्य नागरिकांची होत असलेली आर्थिक लूट थांबविण्यासाठी अधिक कठोर उपाययोजना, जलद तपास आणि फसवणुकीतील रक्कम पीडितांना परत मिळवून देण्यासाठी प्रभावी यंत्रणा उभारण्याची मागणी सभागृहात केली. आमदार दाते सरांनी उपस्थित केलेल्या या प्रश्नामुळे सायबर गुन्ह्यांचा वाढता धोका पुन्हा एकदा अधोरेखित झाला असून नागरिकांनी कोणत्याही अनोळखी लिंक, फोन कॉल किंवा डिजिटल अटकेच्या धमक्यांना बळी न पडण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

## महानगरपालिकेत महावितरण व पाणीपुरवठा विभागासमवेत नगरसेवकांची तातडीची बैठक

कुमारसिंह वाकळे, अमोल गाडे, नगरसेवक निखिल वारे, प्रकाश भागानगरे, बाळासाहेब पवार, संजय चोपडा, महेश लोंढे, अजिंक्य बोरकर, सुरेश बनसोडे, सतीश शिंदे, संजय ढोणे, गोरख पडोळे, महावितरणचे कार्यकारी अभियंता योगेश चव्हाण, पाणीपुरवठा विभागाचे अभियंता गणेश गाडळकर आदी उपस्थित होते.

बैठकीदरम्यान नगरसेवकांनी विविध प्रश्न उपस्थित करत महावितरण विभागावर तीव्र टीका केली. त्यांनी सांगितले की, महावितरण कार्यालयाकडून वारंवार वीजपुरवठा खंडित केला जात असल्यामुळे मुळा धरण येथून होणारा पाणीपुरवठा वारंवार बंद पडतो. परिणामी संपूर्ण शहरातील पाणीपुरवठा विस्कळीत होत असून नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.नगरसेवकांनी अधिकाऱ्यांना सुनावत म्हटले की, महावितरण विभागाने आपली प्रलंबित कामे एकदाच पूर्ण करून घ्यावीत. येत्या शनिवारी आवश्यक शटडाऊन घेऊन सर्व दुरुस्तीची कामे पूर्ण करावीत आणि सोमवारपासून वीजपुरवठा सुरळीत करावा. वर्षानुवर्षे एकाच कामांच्या नावाखाली नागरिकांना वेठीस धरणे योग्य नाही. ठेकेदार आणि अधिकाऱ्यांच्या संगनमताने आर्थिक फायद्यासाठी कामे लांबवली जात असल्याची नागरिकांमध्ये भावना निर्माण झाली आहे.

नगरसेवकांनी पुढे सांगितले की, महावितरण विभाग महानगरपालिकेकडून दरमहा सुमारे दीड कोटी रुपयांचे वीजबिल वसूल करतो. एवढी मोठी रक्कम घेऊनही नागरिकांना दर्जेदार सेवा देता येत नसेल तर त्याचा जाब द्यावा लागेल. नागरिकांकडून वीजबिल थकल्यास तत्काळ वीजपुरवठा खंडित केला जातो, मग सेवा पुरविण्याची जबाबदारी महावितरणची नाही का?

बैठकीत नगरसेवकांनी स्पष्ट इशारा देत सांगितले की, यापुढे कोणतीही पूर्वसूचना न देता वीजपुरवठा खंडित करण्यात आला अथवा शहराच्या पाणीपुरवठ्यावर परिणाम करणाऱ्या घटना घडल्या, तर आम्ही शांत बसणार नाही. नागरिकांच्या रोषाला आम्हालाच सामोरे जावे लागते. त्यामुळे महावितरण विभागाने आपली जबाबदारी ओळखून तातडीने उपाययोजना कराव्यात. अन्यथा अधिकाऱ्यांना काळे फासण्याचे आंदोलन करण्यात येईल.बैठकीत शहरातील पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी महावितरण विभाग आणि पाणीपुरवठा विभागाने समन्वयाने काम करण्याची आवश्यकता व्यक्त करण्यात आली. तसेच नागरिकांना अखंडित वीज व नियमित पाणीपुरवठा मिळावा यासाठी तातडीने प्रभावी उपाययोजना करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

## शेतकरी प्रश्नांवर सरकारने तातडीने निर्णय घ्यावा

आधारित हमीभाव मिळणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. शेतकऱ्याला त्याच्या मालाचा योग्य मोबदला मिळाला तर कर्जमाफीची वेळच येणार नाही, असेही ते म्हणाले.

यावेळी पारनेर व कान्हूर मंडळातील अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांच्या नुकसानभरपाईचा मुद्दाही उपस्थित करण्यात आला. मदतीची रक्कम मंजूर होऊनही विविध तांत्रिक कारणांमुळे अनेक शेतकरी प्रतीक्षेत असल्याचे सांगत ती रक्कम तातडीने लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्याची मागणी करण्यात आली.

सभेत विविध पक्ष व संघटनांच्या प्रतिनिधींनीही आपली मते मांडली. शेतकरी प्रश्नांवर राजकारण न करता सर्वांनी एकत्र येऊन संघर्ष करण्याची गरज असल्याचे वक्त्यांनी नमूद केले. शेतमालाला हमीभाव, सरसकट कर्जमाफी, शेतीपंपांना नियमित वीजपुरवठा, पीकविमा योजनेतील त्रुटी दूर करणे, अतिवृष्टी व दुष्काळग्रस्तांना तत्काळ मदत देणे यासह विविध मागण्या यावेळी करण्यात आल्या.

मोर्चादरम्यान सातबारा कोरा झाला पाहिजे, संपूर्ण कर्जमाफी झालीच पाहिजे, कांद्याला हमीभाव मिळालाच पाहिजे, अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. विशेष म्हणजे, मोर्चा तहसील कार्यालयावर पोहोचल्यानंतर पाऊस सुरू झाला. मात्र पावसाची पर्वा न करता शेतकरी आंदोलनस्थळी ठामपणे उपस्थित राहिले. शासनाने शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत सकारात्मक भूमिका घेत लवकर निर्णय घ्यावा, अन्यथा भविष्यात आंदोलनाची व्याप्ती वाढविण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

या मोर्चात विविध पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, शेतकरी संघटनांचे प्रतिनिधी, महिला कार्यकर्त्या तसेच तालुक्यातील शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.